# शिफारस पत्र

डॉ. नरेंद्र सदाशिव कुंटे,
एम.ए., पी.एच.डी.
मराठी विभाग,
दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय,
सोलापूर.

दिनांक : २५ ऑक्टोबर १९८९.

प्रा. भीमाशंकर शरणाप्पा बिराजदार, यांनी "रत्नाकर मतकरी यांची "जौळ" कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास" या विषयावरील शोध निबंधाचे लेखन माझ्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकपणे पूर्ण केले आहे. यातील विवेचन स्वतंत्र आहे. शोधनिबंधातील मजकुराचा वापर त्यांनी यापूर्वी अन्यत्र कुठे केलेला नाही. हा शोधनिबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, यांना एम्. फिल परीक्षेच्या संदर्भात परीक्षणासाठी लेखकाने सादर करावा यासाठी मी संमती दिली आहे.

PRINCIPAL
DAMANI BHAIRURATAN FATEHCHAND
DAYANAND COLLEGE OF ARTS & SCIENCE SOLAPUR

प्राचार्य,

प्रा. डॉ. नरेंद्र सदाशिव कुंटे,
(मार्गदर्शक)

प्रभाकर पुजारी

प्रा. प्रभाकर पुजारी
एम. ए.
मराठी विभाग प्रमुख
दयानंद महाविद्यालय सोलापूर.

## प्र ति ज्ञा प त्र

" रत्नाकर मतकरी यांची

" जोळ" कादंबरी : एक चिकित्सक अभ्यास ."

हा शोधनिबंध मी स्वत: लिहिलेला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. यापूर्वी अथवा अन्य कुठल्याही परीक्षेसाठी तो सादर केलेला नाही. प्रथमच तो शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना एम्. फिल परीक्षेसाठी सादर करीत आहे.

दि.२५ ऑक्टोबर १९८९.

प्रा.भीमाशंकर शरणाप्पा
बिराजदार.

# ऋण निर्देश

या अभ्यासाला साकार करण्यात अनेकांचा अनेक परीने वाटा असला तरी काहींचा ऋणनिर्देश इथे केला आहे. दयानंद कला व शास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ना. गो. झुंजुरवाड यांनी अभ्यासाविषयी सर्व प्रकारचे सहाय्य व सुविधा उपलब्ध करुन दिल्या. शोधनिबंधाचे मार्गदर्शक प्रा. डॉ. नरेंद्र सदाशिव कुंटे यानी चिकित्सादृष्टी व अभ्यासाची दिशा देवून मार्गदर्शन केले. याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

वालचंद कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य, डी.जी. चव्हाण यांनी अभ्यासाला अनुकूल अशी भूमिका ठेवून सतत या शोधनिबंधाच्या लेखनकार्याचा पाठपुरावा केला. ग्रंथपाल श्री एस्.एन्. मिश्रा यांनी सर्व संदर्भ मिळवून देण्यात बहुमोल सहकार्य केले. याच महाविद्यालयातील हिंदीचे प्रा. निशिकांत ठकार व मराठीचे विभाग प्रमुख प्रा. रतनचंद गांधी यांच्याशी झालेली चर्चा मला उपयुक्त ठरली. याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे.

या शोधनिबंधाचे टंकलेखन करण्याचे काम श्री रमेश नारायण फुटाणे, यानी सुबकपणे व वेळेवर करुन दिले याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

प्रा. भीमाशंकर शरणाप्पा बिराजदार.

## शोधनिबंधाचे विशेषत्व

मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासाच्या वाटचालीत कादंबरीच्या प्रांतात विपुल लेखन केले गेले आहे. आधुनिक मराठी साहित्यात हरिभाऊंच्यापासून रत्नाकर मतकरींच्यापर्यंत कादंबरी लेखनाचा आशय आणि अभिव्यक्ती यांच्या दृष्टीने विविधरूपे व वळणे पहावयास मिळतात. रत्नाकर मतकरी यांची 'जौळ' ही कादंबरी त्यातल्या कौटुंबिक जीवनाच्या संदर्भात रसिकांना अस्वस्थ करणारी ठरली. मतकरींनी या कादंबरीचे रूपांतर 'माझं काय चुकलं ?' या नाटकातही केले, विशेषत: कौटुंबिक जीवनातील नातीगोती यांच्यातील दैनंदिन जीवनात घडून येणारे अनेकविध प्रसंग यातून जो काही एक संघर्ष निर्माण होतो त्याचे एक विदारक पण वास्तव असे स्वरूप रत्नाकर मतकरी यांनी आपल्या कादंबरीतून आणि नाटकातून दाखवून दिले.

रत्नाकर मतकरी यांच्या 'जौळ' कादंबरीचाच प्रामुख्याने हा चिकित्सक अभ्यास असला तरी नाटकाचाही संदर्भ कादंबरीची चिकित्सा करताना जोडून घेतला आहे, त्यामुळे आशयाचे आकलन अधिक चांगल्या रितीने होण्यास मदत झाली आणि भिन्न वाङ्‌मय प्रकार असूनही लेखकाचे कलात्मरूप कसे एकात्म झाले आहे हेही पाहता आले. त्यादृष्टीने प्रामुख्याने कादंबरीचा तपशीलवार अभ्यास करून द्यात नाटकाचा विचारही योग्य वाटेल.

SHRR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

त्याप्रकारे व तिथे केला आहे. कादंबरीत प्रामुख्याने कौटुंबिक प्रश्न संघर्षमय बनलेला असला तरी आणि त्यातून शोकांतिका निर्माण झाली असली तरी या कौटुंबिक प्रश्नामुळेच कुटुंबपध्दती विषयीच सामाजिकतेच्या संदर्भात काही प्रश्न निर्माण होतात. त्यामुळे त्यांचाही ऊहापोह या अभ्यासात केला आहे. चिकित्सेबरोबरच आस्वादनाचे अंगही लक्षात घेतले आहे.

'जैळ' कादंबरीच्या निमित्ताने कौटुंबिक सामाजिक प्रश्न वाङ्मयीन पातळीवर लेखकाने ज्या कलात्मरनपाने उलगडून दाखविला तो लक्षात घेवून चिकित्सक दृष्टीने त्याची चर्चा ही केली आहे. हा अभ्यास करताना एक विशिष्ट अभ्यास पध्दती स्वीकारनन त्यातून विवरण, चर्चा आणि चिकित्सा याद्वारे हाती आलेले निष्कर्ष मराठी वाचक, रसिक आणि समीक्षक यांच्यासाठी नम्रपणाने नमूद करनन ठेवले आहे.

-o-